॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** **website: srtmun.ac.in**

Phone: (02462) 215246 **E-mail: nss@srtmun.ac.in**

जा.क्र.: रासेयो/२०२६—२७/१६५ परिपत्रक दिनांक : ०५/११/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी,

रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये, व

विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत द्वितीय व तृतीय एककांसाठी स्वतंत्र ZBSA बँक खाते उघडण्याबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. रासेयो-२०२६/प्र.क्र.८६/रासेयो कक्ष, दिनांक २४ सप्टेंबर २०२६.

२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शुद्धिपत्रक, पत्र क्र. रासेयो-२०२६/प्र.क्र.८६/रासेयो कक्ष, दिनांक १४ ऑक्टोबर २०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भीय शासनपत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान TSA (Treasury Single Account) प्रणालीद्वारे प्रति रासेयो एकक (१०० स्वयंसेवक) या प्रमाणात वितरित करण्यात येणार आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची एकापेक्षा अधिक एकके कार्यरत असल्यास, प्रत्येक एककासाठी स्वतंत्र ZBSA (Zero Balance Subsidiary Account) बँक खाते उघडणे आवश्यक आहे. यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय रासेयो एककांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र ZBSA बँक खाती तातडीने उघडावीत.

२. एका ZBSA बँक खात्यामध्ये एकापेक्षा अधिक रासेयो एककांचे आर्थिक व्यवहार करण्यात येऊ नयेत.

३. नवीन खाते उघडताना शासनपत्रात नमूद केलेल्या SBI Product Code चा वापर करावा.

४. यापूर्वी उघडलेली ZBSA खाती Inoperative/Dormant असल्यास संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून ती नियमानुसार कार्यान्वित करावीत.

५. प्रत्येक रासेयो एककाच्या अनुदानाचे योग्य Mapping, निधी वितरण व आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

६. ZBSA या संक्षिप्त शब्दाचा विस्तारित अर्थ 'Zero Balance Subsidiary Account' असा वाचण्यात यावा.

७. राष्ट्रीय सेवा योजना १०० स्वंयसेवकांचे एकक समजले जावे, आणि १०० ते २०० विद्यार्थ्यांपर्यंतचे दुसरे एकक म्हणजे रा.से.यो. चे दुसरे युनिट समजले जाईल.

८. दुसरे एककाचे ZBSA (Zero Balance Subsidiary Account) बॅंक खाते उघडण्यासाठी पुर्वीप्रमाणे ZBSA कार्यक्रमाधिकारी—२ आणि प्राचार्य यांचे संयूक्त खाते उघडण्यात यावे. ज्या महाविद्यालयाकडे पूर्वीचे रा.से.यो. स्वंयसेवक विद्यार्थी संख्या १७५ च्या वर आहेत अशा महाविद्यालयांनी दुसरे रा.से.यो. युनिटचे खाते उघडल्यानंतरच १०१ ते २०० स्वंयसेवकांची रक्कम खात्यावर जमा होईल. अन्यथा ZBSA-2 हे खाते नसेल तर होणा—या नुकसानिस सर्वस्वी संबंधित रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार असतील.

७. उघडण्यात आलेल्या ZBSA बँक खात्यांची माहिती शासनाने निर्धारित केलेल्या Excel नमुन्यात भरून दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभाग, प्रस्तुत विद्यापीठाकडे सादर करावी, जेणेकरून सदर माहिती संबंधित रासेयो क्षेत्रीय संचालनालयाकडे पाठविता येईल.

सदर बाब अत्यंत महत्त्वाची व कालमर्यादित असल्याने सर्व संबंधित प्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांनी वरील सोबत जोडलेल्या संदर्भीय परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करून आवश्यक कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी.

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र—कुलगुरु महोदयांचे कार्यालय,प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक : रासेयो-२०२६/ प्र.क्र.८६/रासेयो कक्ष दिनांक:-२४ सप्टेंबर, २०२६

तात्काळ / अति महत्त्वाचे

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक (रासेयो संलग्नित),
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/ संचालनालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विद्यापीठे/महाविद्यालये/संस्थांमध्ये द्वितीय व तृतीय रा.से.यो. एककांसाठी स्वतंत्र ZBSA बँक खाते उघडण्याबाबत..

संदर्भ :-१. युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.K-११०२९ /१/२०२५-NSS, दिनांक २२.०९.२०२६ रोजीचे पत्र.

२. मा. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे यांचे ई-मेल दि. २१.०९.२०२६

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये आपणास सूचित करण्यात येते की, TSA (Treasury Single Account) प्रणालीअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) अनुदान प्रति रा.से.यो. एकक १०० विद्यार्थी या प्रमाणाच्या आधारे वितरित करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने, ज्या विद्यापीठे/महाविद्यालये/संस्थांमध्ये **एकापेक्षा अधिक रा.से.यो. एकके कार्यरत आहेत, अशा प्रत्येक रा.से.यो. एककासाठी स्वतंत्र ZBSA (Zero Balance Savings Account) बँक खाते असणे आवश्यक आहे.** एका ZBSA बँक खात्यामध्ये एकापेक्षा अधिक रा.से.यो. एककांचे निधी व्यवहार ठेवण्यात येऊ नयेत.

उदाहरणार्थ, एखाद्या संस्थेमध्ये **३०० विद्यार्थी संख्येसाठी ३ रा.से.यो. एकके** कार्यरत असल्यास, प्रत्येक रा.से.यो. एककासाठी स्वतंत्र ZBSA बँक खाते असणे आवश्यक राहील. यामुळे प्रत्येक रा.से.यो. एककाची स्वतंत्र ओळख, निधीचे स्वतंत्र लेखांकन तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता व सुसूत्रता सुनिश्चित करता येईल.

नवीन ZBSA खाते उघडताना **SBI Product Code – ५१११२१७१** चा वापर करण्यात यावा. तसेच, पूर्वीची ZBSA खाती **Inoperative/Dormant** असल्यास संबंधित SBI शाखेशी समन्वय साधून सदर खाती नियमानुसार कार्यान्वित करण्याची कार्यवाही करावी.

सदर कार्यवाहीमुळे रा.से.यो. एककांची रचना केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार करण्यास तसेच CNA ते TSA प्रणालीअंतर्गत रा.से.यो. अनुदानाचे अचूक Mapping, निधी वितरण व विनियोग करण्यास आवश्यक सुसूत्रता निर्माण होणार आहे.

त्यामुळे आपल्या विद्यापीठ/संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये/संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या रा.से.यो. एककांच्या संख्येनुसार, **द्वितीय व तृतीय रा.से.यो. एककांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र ZBSA बँक खाते उघडण्याची कार्यवाही तातडीने करावी.**

तसेच, राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत आपल्या विद्यापीठे/महाविद्यालया/संचालनालयामध्ये उघडण्यात आलेल्या **ZBSA खात्यांची सविस्तर माहिती** — संलग्न Excel नमुन्यात अचूकपणे भरून **३०.०९.२०२६ पर्यंत** या कार्यालयास तसेच मा. क्षेत्रीय संचालक, रा.से.यो. क्षेत्रीय संचालनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे यांचेकडे **प्रमाणित करून** सादर करण्यात यावी.

सदर कार्यवाही तातडीची व महत्त्वाची असल्याने, संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करून अनुपालन अहवाल सादर करावा.

आपला,

(डॉ. मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव सादर.

१.मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२.मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
३.मा. सह सचिव(समन्वय /रासेयो कक्ष) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
४.मा. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे
५.निवड नस्ती- रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक : रासेयो-२०२६/ प्र.क्र.८६/रासेयो कक्ष दिनांक:-१४ ऑक्टोबर, २०२६

तात्काळ / अति महत्त्वाचे

शुद्धीपत्रक

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक (रासेयो संलग्नित),
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/ संचालनालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत द्वितीय व तृतीय एककांसाठी स्वतंत्र ZBSA बँक खाते उघडण्याबाबत निर्गमित पत्रातील ZBSA या संक्षिप्त शब्दाच्या विस्तारित रूपामध्ये दुरुस्ती करण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. रासेयो-२०२६/ प्र.क्र.८६/रासेयो कक्ष, दि.२४.०९.२०२६

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत द्वितीय व तृतीय एककांसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत या कार्यालयामार्फत संदर्भाधीन पत्र निर्गमित करण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये ZBSA या संक्षिप्त शब्दाचे विस्तारित रूप नमूद करताना मुद्रणदोषामुळे "Zero Balance Saving Account" असे नमूद झाले आहे.

तथापि, सदर संज्ञेच्या विस्तारित रूपामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने, संदर्भाधीन पत्रामध्ये जेथे जेथे "Zero Balance Saving Account" असा उल्लेख करण्यात आला आहे, तेथे "Zero Balance Subsidiary Account" असे वाचण्यात यावे.

सदर दुरुस्ती वगळता संदर्भीय पत्रातील इतर सर्व मजकूर व सूचना पूर्ववत राहतील.

(डॉ. मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव सादर.

१. मा. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे.
२. निवड नस्ती- रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.